नि.फौ.ख.क्र. ३८७ / २०२३

निशाणी क्र. ४१

**<u>साक्षीदार क्र. ३ चा शपथेवर जबाब</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – पांडुरंग केशव बिडगर

वय सुमारे – ३४ वर्षे, व्यवसाय –शेती व मजुरी

राहणार – वांगी बु., ता.श्रीरामपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी.आर. धुमाळ यांचे मार्फत.</u>**

**१.** घटना दिनांक ०९.१०.२०२२ रोजी वांगी बुाा येथे गट नं ३५ मध्ये आमच्या रहात्या घरी दुपारी १२.३० च्या दरम्यान घडली होती. सचिन दांडगे यांचा लक्ष्मण केशव बिडगर यांच्या फोनवर कॉल आला होता. तो कॉल माझी आई केशरबाई हिने उचलला होता. आई त्यांना उत्तर देत होती की, ' सगळेच घरी आहेत, अमोल घरी आहे, केशव घरी आहे'.

**२.** त्यानंतर १२.०० ते १२.३० च्या दरम्यान मी घराजवळ मक्याचे खळे काढत असताना अनिल ठोंबरे, आदेश बारसे (आरोपी क्र.१), विशाल दांडगे (आरोपी क्र.२), नवनाथ बिडगर (आरोपी क्र. ३), गोरक्ष बिडगर, सागर बारसे, चैतन्य सागर उर्फ सोन्या, आकाश बारसे, आशिष बारसे व इतर अनोळखी आमच्या घरासमोर आले. सगळे एकुण २५–३० जण होते. त्यांनी थेट आमच्या झोपडी सारख्या मंदीरावर हल्ला केला. आमच्या मंदीरातील मुर्ती फेकुन दिल्या. त्यानंतर आमचे बाहेर असलेली भांडी फेकायला लागले, हंडे फोडु लागले. त्यानंतर ते घरात घुसले. घरातील महत्वाची वस्तु जसे की आमच्या घरात ठेवलेले १,००,०००/– रुपये, काही कागदपत्रे घेतले.

**३.** आरोपी क्र,१,२ व चैतन्य सागर उर्फ सोन्या यांनी माझी केसं धरले व मला ओढत बाहेर आणले. मी सोडवून मोबाईल आणण्यासाठी घरात गेलो तर लगेच माझ्या मागे घरात आले. सगळयांनी मिळून मला हाणामार केली व माझी डोक्यावरची केस उपटुन काढली. आरोपी क्र. १ ने माझी केस कापली व आरोपी क्र.२ ने माझी केस उपटुन काढली. त्यावेळेस गौरव बारसे या सर्व प्रकारची व्हीडीओ काढत होता व सचिन दांडगे याला लाईव्ह व्हीडीओ दाखवत होता. अजुन तिघेजणं शुटींग काढत होते.

४. आरोपी क्र. २ ने माझा भाउ अमोल याच्या पायावर कु–हाड हाणली. आरोपी क्र.१ ने रॉड ने माझ्या डोक्यात वार करताना माझी आई केशरबाई हिने मध्येच हात घातला असता वार तिच्या बोटांना लागला व त्यामुळे तिची बोटं मोडली. माझी वहिनी सोनाली बिडगर ही आम्हाला वाचविण्याकरीता मध्ये पडली असता तिला सुध्दा मारहाण केली व तिचे सोन्याचे मंगळसुत्र गहाळ झाले. सागर बारसे कडे दांडक होत, आरोपी क्र. २ कडे कु–हाड व आरोपी क्र. १ कडे रॉड होता. सचिन दांडके कार मध्ये बसला होता व तो सर्व प्रकार पहात होता.

५. हाणामारी मुळे माझ्या पुर्ण अंगाला दुखापत झाली. माझ्या डोक्यालाही मार लागले होते. माझा भाउ लक्ष्मण बिडगर याच्या डोक्यात काहीतरी फेकून मारले होते त्यामुळे त्याचे डोके फुटले होते. लक्ष्मण बिडगर याने सुध्दा या घटनेचा व्हीडीओ काढलेला आहे. तो मोबाईल मी आज रोजी घेवून आलो आहे. सोबत मी पुराव्याचे महत्वाचे कागदपत्र आणले आहे.

६. आरोपी क्र. १ ने जाता जाता आम्हाला धमकी दिली की, ' सचिन दांडकेचा माफी मागण्याचा व्हीडीओ जर नाही पडला, तर परत संध्याकाळी येवून मारणार मी, बरकां पांडया'. आरोपी क्र. २ ने घाणघाण शिवीगाळ करुन 'तुझ्या आईचा नवरा आहे' असे बोलला. आदेश बारसे (आरोपी क्र.१) याचा 'गौ–या गौ–या म्हणुन आवाज रेकॉर्ड आहे. तसेच सागर बारसे याचाही आवाज रेकॉर्ड आहे. मी युटुब वर लाईव्ह असताना आरोपीने माझ्यावर हल्ला केला आहे व तो रेकॉर्ड झाला आहे.

७. दिनांक १ नोवहेंबर २०२२ व इतर आरोपी आम्हाला धमकवण्यासाठी आमच्या घरी आले होते व त्याचाही व्हीडीओ आहे आमच्याकडे माझा ओपो A5S मध्ये आहे. मी पेनड्राइव्ह मध्ये सविस्तर पुरावे दिले आहेत.

८. माझे वडील केशव बिडगर यांनी ११२ वर कॉल केला. ब–याच वेळाने पोलिस आले. पोलिसांनी अॅब्युलन्स बोलाविली व आम्हाला श्रीरामपूर ग्रामीण रुग्णालयात नेले. तेथे मला रक्ताच्या उलटया झाल्या व त्यामुळे डॉक्टरांनी आम्हाला नगर सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविले. आमच्या परिवाराला मे २०२१ पासुन आरोपी धमक्या देत आहेत. मी ब–याच वेळेला पोलिस कंम्प्लेंट केलेली आहे पण त्यावर ठोस कारवाई

झालेली नाही. मी एस. पी कार्यालयाला वारंवार पत्र दिले आहे. ज्या लाकडी दांडक्याने व कु–हाडीने, पहार याने आम्हाला मारहाण करण्यात आली ती पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला आर्टिकल अ, ब, क वरील सदर मुद्देमाल दाखविण्यात आला. सदर मुद्देमालानेच आम्हाला मारहाण झालेली आहे.

९. आज रोजी नवनाथ बिडगर हजर नाही. साक्षीदाराने आरोपी कडे पाहून ओळख पटविली.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.पी. बी. औताडे यांच्या तर्फे सुरु**

१०. **प्रश्न –** तुम्ही असे पोलिसांना सांगितले होते का 'सचिन दांडगे यांचा लक्ष्मण केशव बिडगर यांच्या फोनवर कॉल आला होता. तो कॉल माझी आई केशरबाई हिने उचलला होता. आई त्यांना उत्तर देत होती की, ' सगळेच घरी आहेत, अमोल घरी आहे, केशव घरी आहे'.

**उत्तर –** मला काही माहिती नाही.

**प्रश्न –** तुम्ही असे पोलिसांना सांगितले होते का 'घराजवळ मक्याचे खळे काढत असताना अनिल ठोंबरे, गोरक्ष बिडगर, सागर बारसे, चैतन्य सागर उर्फ सोन्या, आकाश बारसे, आशिष बारसे व इतर अनोळखी आमच्या घरासमोर आले. सगळे एकुण २५–३० जण होते. त्यांनी थेट आमच्या झोपडी सारख्या मंदीरावर हल्ला केला. आमच्या मंदीरातील मुर्ती फेकुन दिल्या. त्यानंतर आमचे बाहेर असलेली भांडी फेकायला लागले, हंडे फोडु लागले. त्यानंतर ते घरात घुसले. घरातील महत्वाची वस्तु जसे की आमच्या घरात ठेवलेले १,००,०००/– रुपये, काही कागदपत्रे घेतले'.........'आरोपी क्र,१,२ व चैतन्य सागर उर्फ सोन्या यांनी माझी केसं धरले व मला ओढत बाहेर आणले. मी सोडवून मोबाईल आणण्यासाठी घरात गेलो तर लगेच माझ्या मागे घरात आले. सगळयांनी मिळून मला हाणामार केली व माझी डोक्यावरची केस उपटुन काढली'................ .'आरोपी क्र.२ ने माझी केस उपटुन काढली. त्यावेळेस गौरव बारसे या सर्व प्रकारची व्हीडीओ काढत होता व सचिन दांडगे याला लाईव्ह व्हीडीओ दाखवत होता. अजुन तिघेजणं शुटींग काढत होते'...................................'आरोपी क्र. २ ने माझा भाउ अमोल याच्या पायावर कु–हाड हाणली. आरोपी क्र.१ ने रॉड ने माझ्या डोक्यात वार करताना माझी आई केशरबाई हिने मध्येच हात घातला असता वार तिच्या बोटांना लागला व त्यामुळे तिची बोटं मोडली.

माझी वहिनी सोनाली बिडगर ही आम्हाला वाचविण्याकरीता मध्ये पडली असता तिला सुध्दा मारहाण केली व तिचे सोन्याचे मंगळसुत्र गहाळ झाले. सागर बारसे कडे दांडक होत, आरोपी क्र. २ कडे कु–हाड व आरोपी क्र. १ कडे रॉड होता. सचिन दांडके कार मध्ये बसला होता व तो सर्व प्रकार पहात होता'.................'हाणामारी मुळे माझ्या पुर्ण अंगाला दुखापत झाली. माझ्या डोक्यालाही मार लागले होते. माझा भाउ लक्ष्मण बिडगर याच्या डोक्यात काहीतरी फेकून मारले होते त्यामुळे त्याचे डोके फुटले होते. लक्ष्मण बिडगर याने सुध्दा या घटनेचा व्हीडीओ काढलेला आहे. तो मोबाईल मी आज रोजी घेवून आलो आहे. सोबत मी पुराव्याचे महत्वाचे कागदपत्र आणले आहे'............................'आरोपी क्र. १ ने जाता जाता आम्हाला धमकी दिली की, ' सचिन दांडकेचा माफी मागण्याचा व्हीडीओ जर नाही पडला, तर परत संध्याकाळी येवून मारणार मी, बरकां पांडया'. आरोपी क्र. २ ने घाणघाण शिवीगाळ करुन 'तुझ्या आईचा नवरा आहे' असे बोलला. आदेश बारसे (आरोपी क्र.१) याचा 'गौ–या गौ–या म्हणुन आवाज रेकॉर्ड आहे. तसेच सागर बारसे याचाही आवाज रेकॉर्ड आहे. मी युटुब वर लाईव्ह असताना आरोपीने माझ्यावर हल्ला केला आहे व तो रेकॉर्ड झाला आहे'..................... 'दिनांक १ नोवहेंबर २०२२ व इतर आरोपी आम्हाला धमकवण्यासाठी आमच्या घरी आले होते व त्याचाही व्हीडीओ आहे आमच्याकडे माझा ओपो A5S मध्ये आहे. मी पेनड्राइव्ह मध्ये सविस्तर पुरावे दिले आहेत'........... 'आमच्या परिवाराला मे २०२१ पासुन आरोपी धमक्या देत आहेत. मी ब–याच वेळेला पोलिस कंम्प्लेंट केलेली आहे पण त्यावर ठोस कारवाई झालेली नाही. मी एस. पी कार्यालयाला वारंवार पत्र दिले आहे'.

**उत्तर –** पोलिसांनी माझा जबाब लिहून घेतलेला नाही.

हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी माझा जबाब घेतला नाही.

**प्रश्न –** तुमच्या जबाबात ते नमुद नाही

**उत्तर –** एस.पी ना लिहुन दिले, सामनेवाल्यांच्या दबावामुळे ब–याच गोष्टी गहाळ केलेल्या आहेत, जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे घेतलेला नाही.

हे म्हणणे खरे आहे की एस.पी यांना लिहून दिलेले पत्र चार्जशिट मध्ये दाखल नाही.

**११.** मला दोन भाउ लक्ष्मण बिडगर व अमोल बिडगर आहे.

मध्यान्नाची वेळझाल्याने तसेच आरोपींच्या विधीज्ञांना काही कागदपत्रे दाखल करणे कामी विनंती केल्याने पुढील तारखे पर्यंत तहकुब .

श्रवणोत्तर स्वीकृती....

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.11.15 10:52:52 +0530

(व्ही.एन.काटकर)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

दिनांक–१४.११.२०२५

न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.